DCNSK-32/63/2025-NTKMA

I/1913863/202

**महाराष्ट्र शासन**

**नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण**

मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, नाशिक रोड, नाशिक - 422101

दुरध्वनी क्र. 0253-2461909

Email- kumbhmela.2027@mah.gov.in

जा.क्र. नात्र्यंकूप्रा/इतिवृत्त/2025/187

दिनांकः स्वाक्षरीखाली नमूद आहे.

प्रति,

1. मा. पोलीस आयुक्त, नाशिक शहर
2. मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक
3. जिल्हाधिकारी नाशिक
4. जिल्हाधिकारी, अहिल्यानगर
5. महानगर आयुक्त, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक
6. आयुक्त, महानगरपालिका, नाशिक
7. पोलीस अधिक्षक, नाशिक ग्रामिण
8. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक
9. मुख्य कार्यकारी अधिकारी, देवळाली कंन्टॉमेंट, नाशिक
10. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक
11. प्रकल्प संचालक, भारतीय राजमार्ग प्राधिकरण, नाशिक
12. अधिक्षक, अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, नाशिक
13. अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र विद्युत वितरण कं. मर्या., नाशिक शहर / ग्रामीण
14. अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नाशिक
15. अधिक्षक, अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नाशिक
16. सहसंचालक, लेखा व कोषागारे, नाशिक.
17. सहसंचालक, नगररचना, नाशिक विभाग.
18. उपसंचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र शासन नाशिक
19. जिल्हाशल्य चिकीत्सक, नाशिक
20. उपवनसंरक्षक पश्चिम विभाग विभाग नाशिक
21. विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, नाशिक
22. कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग क्र. 9 सा.बा. (राष्ट्रीय महामार्ग विभाग)
23. जिल्हा माहिती अधिकारी, नाशिक
24. उपसंचालक, (पर्यटन) नाशिक विभाग
25. प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, नाशिक
26. सहा. संचालक महाराष्ट्र राज्य, पुरातत्व विभाग, नाशिक
27. मुख्य कार्यकारी अधिकारी, नाशिक स्मार्टसिटी
28. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य पायाभुत सुविधा विकास महमंडळ नाशिक
29. उपआयुक्त (नियोजन), नाशिक विभाग, नाशिक.
30. विभागीय रेल्वे व्यवस्थापक, भुसावळ यांचे प्रतिनीधी

31. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नाशिक
32. मुख्याधिकारी त्र्यंबक नगरपरिषद

विषय- कुंभमेळा 2027 साठी कुंभमेळा प्राधिकरणाच्या दि. 19/11/2025 रोजी घेण्यात आलेल्या आढावा बैठकीचे इतिवृत्त.

महोदय/ महोदया,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सिंहस्थ कुंभमेळा 2027 कुंभमेळा प्राधिकरणाच्या दि. 19/11/2025 मा. अध्यक्ष, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

सदर बैठकीचे इतिवृत्त सोबत पाठविण्यात येत असून मा. अध्यक्ष, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा विभागीय आयुक्त, नाशिक महोदय यांचे सूचनेनुसार सदर इतिवृत्तात नमूद केल्याप्रमाणे आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या सूचनांप्रमाणे कार्यवाही करून त्याचा अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा, ही विनंती.

Signed by Yogendra Ashok Chaudhari
Date: 20-11-2025 15:31:37

(योगेंद्र चौधरी)
उपआयुक्त (नियोजन)
नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण.

**नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा दिनांक १९/११/२०२५ रोजी झालेल्या कुंभमेळा प्राधिकरणाच्या बैठकीचे इतिवृत्त.**

दिनांक १९/११/२०२५ रोजी डॉ.प्रविण गेडाम, अध्यक्ष, नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा व प्राधिकरणाची बैठक घेण्यात आली. बैठकीत उपस्थितांचे यादी सोबत संलग्न आहे. कुंभमेळा आयुक्त तथा सदस्य सचिव यांनी सर्व प्राधिकरण सदस्याचे स्वागत केले आणि बैठकीस सुरुवात झाली.

**विषय क्रमांक ०१:- ओझर HAL AIR PORT इमारत बांधकाम करणेबाबत:-**

श्रीमती.अरुधंती शर्मा, अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक यांनी हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड, नाशिक (ओझर) येथे नवीन इंटीग्रेटेड टर्मिनल इमारत बांधकाम करणे व अनुषंगिक कामे एप्रॉन, वाहनतळ, एरोब्रिज, एअरपोर्ट सिक्युरिटी इक्युपमेन्ट, परिसर विकास इत्यादी विकास कामे करण्याबाबत प्राधिकरणास सादरीकरण केले. सदर इमारत व इतर अनुषंगिक कामे ही कुंभमेळयासाठी आवश्यक असल्याचे अधिक्षक अभियंता यांनी नमूद केले तसेच सदर कामांसाठी एकुण रु.५५५.९८ कोटीच्या प्रस्तावाला प्राधिकरणामार्फत मंजुरी देण्यास अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक विनंती केली आहे. याबाबत कुंभमेळा आयुक्त यांनी सदर कामे हे कुंभमेळा सुरु होण्यापुर्वी पुर्ण होणे आवश्यक असल्याचे नमूद केले. त्यानूसार मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम यांनी सदर काम मार्च-२०२७ पुर्वी पुर्ण करण्यात येईल, असे आश्वासित केले.

कुंभमेळा आयुक्त यांनी सदर कामासाठी लागणाऱ्या DGCA, BCAS, aorodrome emergency management commettee, इ. तसेच राज्य शासनाच्या व केंद्र शासनाच्या आवश्यक परवानगी सार्वजनिक बांधकाम विभागाने त्यांचेस्तरावरुन तात्काळ प्राप्त करुन घेण्यात याव्यात, जेणेकरुन भविष्यात प्रकल्पास विलंब होणार नाही. असे सूचित केले. सन २०१३ मध्ये झालेल्या कराराचे धर्तीवर HAL आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी सामजंस्य करार तात्काळ करुन घ्यावा. सदर सामजंस्य करारामध्ये नवीन टर्मिनल इमारत व इतर अनुषंगिक कामांचे देखभाल व दुरुस्तीचा देखील समावेश करण्यात यावा. नवीन टर्मिनल इमारत व इतर कामे पुर्ण झाल्यानंतर देखभाल व दुरुस्ती याची जबाबदारी HAL AIR PORT विभागाने घ्यावी. तसेच नवीन ट्रमिनल इमारत सतत व निरंतर नागरी विमान नागरीकांसाठी सुरु ठेवावे. असे कुंभमेळा आयुक्त यांनी सूचित केले.

मा.अध्यक्ष महोदय यांनी सदर प्रकल्प शासनाने मान्यता दिलेल्या रु.५१४० कोटीच्या कामामध्ये समावेश नव्हता. तरी सदर कामाला प्राधिकरणाचे मान्यतेने प्रशासकिय मान्यता देवून नगर विकास विभागाकडे पुढील टप्प्यातील मागणीमध्ये समावेश करुन घेण्यात यावा. असे प्राधिकरणातील सर्व उपस्थित अधिकारी यांनी सर्वांनुमते बैठकीत निर्णय घेण्यात आला.

**विषय क्रमांक ०२:- साधुग्राम:-**

कुंभमेळयासाठी लागणाऱ्या साधुग्रामसाठीचे लेआऊट प्लॅनिंग व सर्वे नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्र व त्र्यंबक नगरपालिका कार्यक्षेत्रासाठी नाशिक महानगरपालिका सर्वेक्षण करेल व सिव्हील वर्कसासाठी नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रासाठी नाशिक मनपा व त्र्यंबक नगरपालिका कार्यक्षेत्रासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग करेल. नाशिक महानगरपालिका आणि त्र्यंबक नगरपरिषद यांनी साधुग्रामचे पुढचे काम लक्षत घेता साधुग्राम जमीनीचे Land Clearing आणि Land Prepation साठी तयारी ठेवावी. असे कुंभमेळा आयुक्त यांनी सूचित केले त्यानूसार कुंभमेळा प्राधिकरणाने मान्यता दिली असे.

**विषय क्रमांक ०३:- नाशिक महानगरपालिका निधीबाबत:-**

नाशिक महानगरपालिकेला रस्ते व पुलांचे कामांसाठी प्रशासकिय मान्यता देण्यात आली होती. नाशिक महानगरपालिकेमार्फत रस्ते व पुलांचे कामांमध्ये बचत झाल्याचे पत्राद्वारे कळविले आहे. तरी सदर बचतीमधून नाशिक महानगरपालिकेने गणेशवाडी येथील वाघाडी नदीवरील संरक्षण भिंत बांधणेसाठी व रस्त्याच्या कामांची आवश्यकता असल्याची विनंती केली. त्यानूसार प्राधिकरणामार्फत बचतीच्या निधीच्या मर्यादेत कुंभमेळयासाठी आवश्यक कामे घेण्याबाबत सहमती देण्यात आली.

मा.कुंभमेळा आयुक्त यांनी बैठकीस उपस्थितांचे आभार मानुन बैठक संपल्याचे जाहीर केले.

Signed by Praveen
Nilkanthrao Gedam
Date: 19-11-2025 20:11:10

**(डॉ.प्रविण गेडाम)** (भा.प्र.से.)
**अध्यक्ष, कुंभमेळा**
**नाशिक त्रंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण**